**साक्षीदार क्र.१** **समरी फौ. खटला क्र.१२८७/२०२३**
**नि.९**

**मी सत्य प्रतिज्ञेवर कथन करतो ते खालीलप्रमाणे की,**

नाव :- सुरज भानुदास शिंदे
वय :- २८ वर्षे धंदा :- गृहरक्षक
नेमणुक :- वाई पोलिस स्टेशन, ता.वाई जि.सातारा .

**शपथेवर सरतपास सहाय्यक सरकारी वकील सौ. एस. ए. महाडीक यांचेमार्फत सुरु :-**

मी गृहरक्षक म्हणुन ५ वर्षांपासुन वाई पोलिस स्टेशन येथे कार्यरत आहे. दिनांक १२.०८.२०२३ रोजी सकाळी १० ते रात्री ९ वाजता एस.टी.स्टँड वाई येथे माझी डयुटी होती. माइयासोबत श्री गायकवाड होते. शनिवार असल्याने शाळा सुटली होती व मुलांची गर्दी होती. दुपारी १.१० मिनीटांनी वाई बालेघर बस क्रमांक एम.एच.१४-बीटी-०४९६ ही बस फलाट क्रमांक ६ वर लागत होती. सदरची बस लागत असताना गर्दी असल्याने बसचा धक्का मुलीला लागला. धक्का लागल्याने मुलगी बसच्या डाव्या बाजुच्या चाकाखाली आली. तिच्या डोक्यावरुन बसचे डाव्या बाजुचे पाठीमागचे चाक गेले. त्यात तिच्या डोक्याचा चेंदामेंदा झाला व ती जागेवर मृत्यु पावली.

२. त्यानंतर मी पोलिस स्टेशनला फोन केला व रुग्णवाहिकेला फोन केला. मुलीला स्टाफच्या सहाय्याने ग्रामीण रुग्णालय वाई येथे दाखल केले. मुलीचे दप्तर तपासले. दप्तरामध्ये तिचे ओळखपत्र सापडले. त्यावर शाळेचे नाव तिर्थलक्ष्मी जोशी विद्यालय वाई असे होते व मुलीचे नाव श्रावणी अहिवळे होते. सदरची बस आरोपी चालवत होता. सदरचा अपघात आरोपीच्या हलगर्जीपणामुळे व चुकीमुळे झाला होता.

३. त्यानंतर मी पोलिस स्टेशनला तक्रार दिली. आता मला ती तक्रार दाखवण्यात आली. त्यावर माझी सही आहे. त्यातील मजकुर खरा व बरोबर आहे. त्यास **निशाणी १०** देण्यात येते. मी आरोपीस पाहिल्यास ओळखू शकतो. आज आरोपी न्यायालयात हजर आहे. तक्रार दिल्यानंतर मी पोलिसांना घटनास्थळ दाखवले. पोलिसांनी घटनास्थळाचा पंचनामा केला.

**सरतपास पुर्ण,**

**उलटतपास आरोपीतर्फे ॲड. श्री. एम. वाय. शिंदे यांचे मार्फत शपथेवर सुरु-**

४. मी बावधन गावचा कायमस्वरुपी रहिवासी आहे. माझे शिक्षण किसनवीर कॉलेज वाई येथे झाले आहे. मी शिक्षण करत असताना एस टी ने प्रवास करत होतो हे म्हणणे खरे आहे. त्यामुळे वाई बसस्थानक परिसराची मला चांगली माहिती आहे हे म्हणणे खरे आहे.

५. वाई बस स्थानकात पुढील बाजुस ६ व मागील बाजूस ६ असे फलाट आहेत. ज्या वेळी घटना घडली त्यावेळी मागील बाजुचे काम चालू असल्याने फलाट बंद होते हे म्हणणे खरे आहे. त्यामुळे मागील बसेस पुढील बाजुच्या फलाटावर थांबत होत्या हे म्हणणे खरे नाही. मागील बाजूचे काम चालू असल्याने बसेस पुढील बाजुस थांबत होत्या हे म्हणणे खरे आहे.

६. गृहरक्षक म्हणुन माझी फिक्स पॉईंट ड्युटी असते हे म्हणणे खरे आहे. एस.टी.बसच्या चौकशी कक्षाचे शेजारी पोलिस चौकी आहे हे म्हणणे खरे आहे. त्यावेळी मी पोलिस चौकीत होतो हे म्हणणे खरे आहे. गर्दी असल्यावर चौकशी विभागातुन व पोलिस चौकीतुन बाहेरील लोकांची गर्दी दिसुन येत नाही हे म्हणणे खरे आहे. घटनेच्या दिवशी लोकांचा गोंधळ व अचानक आवाज असल्याने त्यावेळी मला समजले की बाहेर अपघात झाला आहे हे म्हणणे खरे आहे. त्यानंतर ज्या ठिकाणी लोकांची गर्दी होती त्या ठिकाणी मी व गायकवाड गेलो हे म्हणणे खरे नाही.

७. पोलिसांना माझ्या सांगण्याप्रमाणे जबाब दिला आहे. माझ्या जबाबात "त्यावेळी अचानक लोकांचा गोंधळ व मोठयाने लोकांचा आवाज ऐकु आला" असे नमुद आहे. मी घटनास्थळी २/३ मिनीटात पोचलो. त्यावेळी गाडी शेजारी अनेक लोक जमा झाले हे म्हणणे खरे आहे. लोकांना बाजुला करुन अपघाताची परिस्थीती पाहिली हे म्हणणे खरे आहे.

८. मी लोकांकडे अपघाताची चौकशी केली नाही. मी स्वतःहुन सांगतो मी अपघात स्वतः पाहिला आहे. मी अपघात स्वतः पाहिल्याचे खोटे सांगतो हे म्हणणे खरे नाही.

९. बस फलाट क्र.६ वर लागण्यापूर्वी घटना घडली हे म्हणणे खरे आहे. सदरची बस ही एकमेव मांढरदेव बालेघरला जाणारी असल्याने लोकांची गर्दी होती हे म्हणणे खरे आहे.

प्रवाशांनी किंवा मुलांनी बस फलाटावर लागल्यानंतर बसमध्ये चढायचे असते हे म्हणणे खरे आहे. लोक बस येण्यापूर्वीच तिच्या दिशेने धावत गेले हे म्हणणे खरे नाही. बसस्थानकात सी.सी.टी.व्ही. बसवले आहेत हे म्हणणे खरे आहे. मला त्या दिवशीचे बस स्थानकाचे सी.सी.टी.व्ही.चे फुटेज दाखवल्यास मी ते ओळखू शकतो.

**आरोपीच्या विधीज्ञांच्या विनंतीवरुन उलटतपास पुढील तारखेपर्यंत तहकुब-**

**सं.वा.पु.के.**
**समक्ष/ श्रवणोत्तर स्वीकृत**

SMRUTI SAGAR PALSULE
Digitally signed by SMRUTI SAGAR PALSULE
Date: 2024.11.15 13:20:59 +0530

**{एस.एस.पळसुले}**

**दिनांक :-१५.११.२०२४** **प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी,वाई.**